**महाराष्ट्र शासन**

कृषि विभाग

**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प**

००५ ४०० मुंबई , कफ परेड ,ट्रेड सेंटर वर्ल्ड ,अर्केड ३०

दूरध्वनी क्र. ०२२-२२१६३३५१/५२ ईमेल-:mahapocra@gmail.com

**पत्र क्र.नादेकृसंप्र१०२२/कृषिविद्या/परिषद/प्र.क्र.१७०/६०१** **दिनांक: ७.१२.२०२२**

**प्रति,**

**विषय-: दि. २२-२४ डिसेंबर, २०२२ रोजी CRIDA, हैदराबाद येथे आयोजित प्रदर्शनीमध्ये प्रकल्पाविषयी माहिती सादर करण्यासाठी फ्लेक्स छपाईकरिता दरपत्रक मागविणेबाबत...**

१ . आपणास माहिती पुस्तकाचे डिझाईन करणे बाबत विनंती करण्यात येत आहे.

| सेवेचे वर्णन | संख्या | सेवा पुरवण्याचा कालावधी | पुरवठा करावयाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| प्रकल्पाविषयी माहिती सादर करण्यासाठी रंगीत स्टार फ्लेक्स छपाई करणे.<br>डिझाईन साईज-९x९ फुट | ३ | ७ दिवस | मा. प्रकल्प संचालक,<br>नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प<br>३० अ/ब-अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड , मुंबई ४०० ००५. |

२. शासनास जागतिक बँकेकडून नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी निधी मंजूर झालेला आहे. सदर निधी मधील काही रक्कम या दरपत्रकान्वये करण्यात येणाऱ्या करारनाम्यानुसार करावयाच्या पात्र प्रदानासाठी वापरण्यात येणार आहे .

३. निविदा किंमत

अ. करार हा वरील नमूद केलेल्या बॅनर डिझाईनबाबत असेल त्यात काही बदल असु शकेल.

ब . सेवेसाठीच्या किंमतीमध्ये सर्व कर व उपकर यांचा समावेश असेल.

क. वस्तू व सेवाकर वेगळा दाखविण्यात यावा.

ड. निविदाकाराने सादर केलेले दर हे करारनाम्यातील कालावधीसाठी स्थिर असतील व त्यात कोणत्याही कारणामुळे बदल होणार नाही.

इ. दरपत्रकातील दर हे भारतीय रुपयात सादर करावेत.

४. प्रत्येक निविदाकार एकच दरपत्रक सादर करेल. या दरपत्रकाबाबत निविदाकार इतर निविदाकारांशी संपर्क करणार नाही.

५. दरपत्रकाची वैधता

दरपत्रक सादर करावयाच्या अंतिम तारखेपासून १५ दिवसापर्यंत दरपत्रक वैध राहील.

६.दरपत्रकांचे मुल्यमापन:

खरेदीदार खालील बाबींबाबत निविदाकरांनी दिलेल्या प्रतिसादाशी दरपत्रकांची तुलना व मुल्यमापन करेल.

अ. दरपत्रके योग्य प्रकारे स्वाक्षरी केलेले आहेत.

ब. दरपत्रकातील अटी, शर्ती व निकषांची पूर्तता करतात.

क. दरपत्रकातील सर्व सेवांची तुलना व मुल्यमापन एकत्रित करण्यात येईल.

ड. वस्तु व सेवाकर दरपत्रकांचे मुल्यमापन करण्यासाठी ग्राहय धरण्यात येणार नाही.

७. आदेश

ज्या निविदाकाराचे दर हे सर्वात कमी आहेत त्या निविदाकाराचे दर मंजूर करण्यात येतील व मंजूरीच्या दिनांकापासून एक महिन्यासाठी त्याच दराने सेवा पुरवावी लागेल.

७.१ सेवा खरेदीदारास कोणतेही दरपत्रक मान्य करण्याचा वा अमान्य करण्याचा अधिकार व दरपत्रकांची प्रक्रिया रद्द करुन सर्व दरपत्रके रद्द करण्याचा अधिकार राहील.

७.२ ज्या निविदाकाराचे दर मान्य करण्यात आलेले आहेत त्यांना आवश्यकतेनुसार सेवा पुरवठा करणेबाबत कळविण्यात येईल.

८. सेवेचा पुरवठा केल्यानंतर देयकाची अदायगी करण्यात येईल.

९. आपणांस विनंती करण्यात येते की, आपले सील बंद दरपत्रक दि. १३.१२.२०२२ पर्यंत दुपारी २.०० वाजेपर्यंत सादर करावेत.

१०. आम्हाला आशा आहे की, आपण आपले दरपत्रक सादर कराल तसेच, आपण या प्रकल्पात इच्छा दाखविल्याबाबत धन्यवाद.

**दिनांक : ७.१२.२०२२**
**ठिकाण : मुंबई**

**नाव: प्रताप गिते**
**हुद्दा: प्रकल्प उपसंचालक**
**पत्ता : ३०/ब अर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर,**
**कफ परेड , मुंबई-०५.**
**दुरध्वनी क्र: ०२२-२२१६३३५१/५२**

०/८